अत्यंत महत्वाचे

**मुंबई विद्यापीठ**

क्र.वि.क./ २८ / २००८

परिपत्रक

प्राचार्य / संचालक मान्यता प्राप्त पदव्युतर संस्था आणि प्राचार्य कला वाणिज्य, विज्ञान विधी, अभियांत्रीकी, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालये / संस्था यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

दिनांक २५ जानेवारी २००८

कुलसचिवांकरीता

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

फोन नं. ०२०/२६१२२११६२, २६०५१५१२, २६१३०६२७ फॅक्स नं. २०/२६१११११५३
क्रमांक-एनजीसी/०६/अपंग अनुशेष/मवि-१ ७७२० दिनांक - २३/१०/२००७

अत्यंत महत्वाचे / तातडीने कार्यवाहीसाठी /
परिपत्रक

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक उच्चशिक्षण
२. सर्व कुलसचिव,
   अकृषी विद्यापीठे
३. सर्व मा. कुलगुरु
   अकृषी विद्यापीठे.

---

विषय- अपंग भरती / अपंग विद्यार्थी प्रवेश / अपंग व्यक्ती अधिनियम१९९५ वरील कार्यवाही बाबत

संदर्भ- शासनाचे परिपत्रक क्रं अपंग २००३ / प्र.क्रं.२२२/ सुधार -३
दिनांक २७/०१/२००४

अपंग व्यक्ती (समानसंधी, हक्काचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील खालील दिलेल्या तरतुदी प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्या विभागातील सर्व अशासकीय / शासकीय/ शासकीय महाविद्यालये / अध्यापक महाविद्यालये / विधी महाविद्यालये /सर्व विज्ञान संस्था/ प्रि. आय.ए. एस. सेंटर/ सर्व अकृषी विद्यापीठे व इतर सर्व शैक्षणिक संस्थांना तात्काळ कळवावे.

१. अपंग व्यक्तीसाठी अध्यापक महाविद्यालयाची स्थापना करण्याची कार्यवाही यावी.
२. अपंगासाठी शासन सेवेत अपंग आरक्षण ठेवण्याची पदे शोधुन काढणे अंध / अल्पदृष्टी/ कर्णबधीर अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पाक्षघात यासाठी प्रत्येकी १ टक्का व ३ टक्के प्रमाणे आरक्षण ठेवण्यात यावे.
३. वरीष्ठ महाविद्यालयांत प्रवेशासाठी अपंग विद्यार्थ्यांसाठी ३ टक्के आरक्षण ठेवण्यात यावे . त्याची यादी दरवर्षी पाठवावी.
४. महाविद्यालयांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प उभारणे, स्वतंत्र व तळमजल्यावरच प्रसाधनगृहाची सुविधा तयार करणे.
५. अपंग विद्यार्थ्यांसाठी अडथळा मुक्त वातावरण तयार करणे तसेच उंच इमारत असेल तर त्या विद्यार्थ्यासाठी तळ मजल्यावर शिक्षण देणेची सोय उपलब्ध करणे.
६. प्रत्येक अपंग मुलाला वयाच्या १८ वर्षापर्यंत मोफत शिक्षण देण्यात यावे.
७. अपंग विद्यार्थ्यांना एकात्मिक शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात यावे.

[कृ.मा.प.]

८. शासकीय व अशासकीय क्षेत्रांना प्रोत्साहन देऊन अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विशेष शाळा स्थापन करणे व त्यामध्ये व्यवसाय शिक्षण देण्याची सोय उपलब्ध करणे.
९. अपंग विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणानंतरचे शिक्षण पुर्ण करता आले नसल्यास त्यासाठी अशांकालिन वर्गांची व्यवस्था करणे.
१०. १६ वर्षाच्या पुढील अपंग विद्यार्थ्यांना कामचलाऊ शिक्षण देण्यासाठी व्यवस्था करावी.
११. ग्रामीण भागातील मनुष्यबळाचा वापर करुन अपंग व्यक्तींना अनौपचारिक शिक्षण सुविधा उपलब्ध करुन देणे.
१२. मुक्त शाळा / मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातुन शिक्षण देणे.
१३. इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपयोग करणे.
१४. प्रत्येक अपंग मुलाला मोफत पुस्तके व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देणे.
१५. अपंगांच्या शिक्षणाच्या संदर्भात संशोधन करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शासकीय संस्था व अन्य माध्यमातुन नवीन शिक्षण पध्दती अंमलात आणणे व त्यासाठी प्रगत तंत्रज्ञान व साहित्य मिळवुन देणे.
१६. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या संस्थांना पुरक अशी शिक्षक प्रशिक्षण संस्था स्थापन करुन विशेष शाळा व एकात्मिक शिक्षण युनिटसाठी विशेष शिक्षक उपलब्ध करुन देणे.
१७. अपंग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी प्रवास सवलत अथवा त्यांच्या पालकांना पर्यायी सुविधा पुरविणे.
१८. शाळा/महाविद्यालये/ व्यवसाय शिक्षण देणा-या संस्थांमध्ये अपंग विद्यार्थ्यांना सहज वावरता यावे यासाठी अडथळा मुक्त वातावरण निर्माण करणे.
१९. शालेय शिक्षण घेणा-या अपंग विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश व इतर साहित्य पुरविणे.
२०. अपंग विद्यार्थ्यांच्या पालकाच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र मंचाची स्थापना करणे.
२१. अपंग विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृती देणे व विद्यापीठ फंडातुन पात्र अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवती देण्यासाठी विद्यापीठाच्या कौशिलकडुन प्रस्ताव मंजुर करुन घेऊन शिष्यवती देण्यात यावी.
२२. अपंग विद्यार्थ्यांसाठी परीक्षा पध्दतीमध्ये आवश्यक ते फेरबदद्ल करणे विशेषत अंध व अंशत अंध विद्यार्थ्यांना गणित ऐवजी पर्यायी देण्याची व्यवस्था करणे.
२३. प्रत्येक अपंग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनुरुप सुसंगत असे अभ्यासक्रम फेरबदल करणे
२४. कर्णबधीराकरीता अभ्यासक्रमात फेरबदल करुन एकाच भाषेचा वापर करण्याकरीता अभ्यासक्रमात योग्य तो बदल करणे.
२५. अंध व कमी दृष्टी असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थामध्ये लेखनीक मदतनीसाची सोय करणे. व विद्यापीठ अधिनियमात तसा अंतर्भाव करुन अपंगांना लेखनिक पुरवावा.
२६. शासकीय तसेच शासनाकडुन अनुदान घेणा-या सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये अपंगासाठी ३ टक्के जागा राखीव ठेवणे.
२७. विद्यापीठ स्तरावरुन महाविद्यालयास संलग्नीकरण देताना वरील सर्व तरतुदींच्या अटींचा अंर्तभाव करावा.

अपंग विद्यार्थ्यांना वरील सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आपल्या विभागीय कार्यालयाची सुध्दा आहे. व या दृष्टिने गांर्भीय पुर्वक विचार करुन या जबाबदारीची पुर्तता करण्याच्या दृष्टिने व अपंग अधिनियम १९९५ मधील तरतुदीचा अपंग विद्यार्थ्यांना फायदा मिळावा त्यादृष्टिने आपल्या विभागीय स्तरावरुन प्रत्येक जिल्हात राबविण्यात यावी व तसा सविस्तर अहवाल तात्काळ शासनास व संचालनालयास पाठवावा.

सही/-
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य पुणे, यांचेकरीता.

प्रत - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन यांना माहितीस्तव सविनय सादर.